# उमंग आहे, तर जीवनात रंग आहे

फूल कितीही सुंदर असो, परंतु कोमेजलेले असेल तर सर्व काही व्यर्थ आहे. सुवर्ण अलंकारांनी सुसज्जित अंग रूपाशिवाय आणि आरशाशिवाय व्यर्थ आहे. जीवनसुद्धा उमंगाचे दुसरे नाव आहे. उमंग हीन जीवन त्याप्रमाणे आहे, जसे हवेशिवाय फुगा आणि उजेडाशिवाय तारा. जीवनाला जिवंततेने जगणे आणि आशेचे दीपक पेटवून सतत नीन उंचीला शिवणे, हाच उमंग आहे. जेथे उमंग आहे, तेथे जीवनात नित्य नवीन रंग आहेत.जेथे उमंग आहे, खुशी आहे, तेथे नित्य नवे काही करण्याचा संकल्प असतो. सृजनशीलता उमंगाचा परिचायक आहे. जे सृजनशील आहेत, त्यांच्या मनात उमंग असतो कारण की ते अथक असतात. जेव्हा आपण आपल्या मानसकतेला आणि चित्तवृत्तीला अशा प्रकारचे प्रशिक्षण देता की मला अमूक कार्यात विजय मिळवायचाच आहे.जेव्हा आपण आपल्या पराजयाला सुद्धा प्रगतीचे दा समजता. आपल्या चुकांपासून शिकवण घेऊन पाऊल पुढे टाकीत जाता, तेव्हा यश दासी बनून आपले चरण शिवते. येथे हे यथार्थ जाणून घेणे आवश्यक आहे की आपली दृड इच्छा शक्ती, लगन आणि परिश्रम, उंच मनोबल, अदम्य साहस आणि विश्वासच आपल्याला यशाच्या दरवाजापर्यंत घेऊन जाईल. म्हणून जीवनात नित्य नवीन उमंगांच्या आणि तरंगांच्या द्वारे सृजनाच्या पथावर पुढे जात राहावे.

स्वमान उमंगांची खाण - संसारात भौतिक उपलब्धी मिळविणारे लोक दिवसरात्र मी असा आहे, मी तसा आहे, मी हे केले, मी ते केले ही रट लावीत राहतात. परंतु हे सर्व विनाशी आहे. जर आपल्याला सदा काळ उमंग आणि खुशीत राहायचे आहे, तर निज आत्म्याच्या सत्य स्वरूपाला जानने, समजणे आणि स्मरण ठेवायला हवे. वास्तविक पाहता जे काही बाहेर दिसत आहे आणि बाह्य जगतात मी जे काही अर्जित केले आहे, ते काहीच सुद्धा मी नाहीये. आणि जे दिसत नाही तेच मी आहे. मज आत्म्याचा स्वधर्म शांति आहे, माझे सत्य स्वरूप शांति, प्रेम आणि पवित्रता आहे. मी सतत खुशी आणि आनंदाच्या सागरात गोते खाणारी आत्मा आहे. जर सदैव हेच स्मृतीत ठेवले आणि स्मृती स्वरूप आत्मा बनून प्रत्येक कर्म व व्यवहार केला, तर निश्चितच आमचे जीवन खुशी आणि उमंगाने भरेल. ज्याच्या जीवनात आळस, अलबेलापण आणि निराश आहे, त्याच्यापासून यश नेहमी दूर आहते आणि त्याच्या जीवनात नीरसता पसरलेली राहते. परंतु जेथे चेतनता आणि जागरूकता आहे, खुशी आणि उमंग आहे, त्या जीवनाची बाग सदैव फलत-फुलत राहते आणि नित्य नवीन रंगांनी सजत राहते.

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स